**ठळक बातम्या**

- करविषयक कायदे आणि प्रक्रियांचं सुलभीकरण करून देशाची प्रगती आणि रोजगारनिर्मितीला चालना देण्याची सरकारची भूमिका असल्याची अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांची लोकसभेत ग्वाही

- राज्यसभेच्या १२ जागांच्या पोटनिवडणुकीसाठी ३ सप्टेंबरला मतदान, महाराष्ट्रातल्या दोन जागांचा समावेश

- शेअर बाजारातली घसरण थांबली, सेन्सेक्समध्ये ८७५, तर निफ्टीत ३०५ अंकांची वाढ

- तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात श्रीलंकेचं भारतापुढं विजयासाठी २४९ धावांचं आव्हान /भारतीय फलंदाजांची हाराकिरी

**आणि**

- पॅरीस ऑलिम्पिकमधे, वजन अधिक भरल्यानं भारताची पैलवान विनेश फोगाट अंतिम सामन्यासाठी अपात्र, भारताकडून निषेध

**<><><><><>**

करासंबंधीचे कायदे आणि प्रक्रियांचं सुलभीकरण करून त्याद्वारे देशाची प्रगती आणि रोजगारनिर्मितीला चालना देण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सरकारचा दृष्टिकोन असल्याची ग्वाही अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज दिली. अर्थ विधेयक २०२४ वरच्या चर्चेला त्यांनी लोकसभेत उत्तर

दिलं. सरकारनं गेल्या दशकात कर प्रशासनात अमूलाग्र बदल केले आहेत. करांमध्ये भरमसाठ वाढ न करता यात सुलभीकरण आणलं आहे. यामुळे पारदर्शकता वाढली आहे, असंही त्या म्हणाल्या. मध्यमवर्गावरचं कराचं ओझं वाढल्याचे दावे त्यांनी फेटाळून लावले. गेल्या दोन वर्षांत मध्यमवर्गाला मोठा दिलासा देण्यात आल्याचं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

वायनाडमध्ये दरड कोसळून झालेली दुर्घटना राष्ट्रीय आपत्ती म्हणून घोषित करावी, अशी मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केली. सभागृहात शून्य प्रहरादरम्यान त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला आणि दुर्घटनाग्रस्तांना नुकसानभरपाई वाढवून देण्याचीही मागणी केली. अशा प्रकारच्या आपत्तीचा सामना करू शकेल, अशा पायाभूत सुविधांसह वायनाडसाठी सर्वसमावेशक पुनर्वसन निधी जाहीर करावा, असं राहुल गांधी म्हणाले. वायनाडमध्ये केंद्र आणि राज्यांची सरकारं, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, लष्कर, नौदल, तटरक्षक दल, अग्निशमन दल यांनी केलेल्या कामाचं त्यांनी कौतुक केलं.

**<><><><><>**

राज्यसभेच्या, ९ राज्यांमधल्या १२ जागांवर होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक आयोगानं आज अधिसुचना जारी केली. महाराष्ट्रात, खासदार उदयनराजे भोसले आणि पियुष गोयल लोकसभेवर निवडून गेल्यामुळे दोन जागांवर पोटनिवडणूक होणार आहे. या सर्व जागांसाठी या महिन्याच्या १४ तारखेला निवडणुकीसाठीची अधिसूचना

जारी केली जाणार आहे. या महिन्याच्याच २२ तारखेला अर्जांची छाननी होईल. तसंच २६ आणि २७ तारखेपर्यंत अर्ज मागे घेतले जातील आणि ३ सप्टेंबरला मतदान होईल.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दोन दिवसांच्या न्यूझीलंड दौऱ्यावर असून उद्या त्या राजधानी वेलिंग्टनला भेट देतील. होंगी परंपरा, माओरी स्वागत समारंभ आणि हाका सादरीकरण अशी न्यूझीलंडची समृद्ध परंपरा त्या अनुभवणार आहेत. राष्ट्रपती मुर्मू गव्हर्नर जनरल किरो, प्रधानमंत्री क्रिस्तोफर लक्सन आदी महत्वाच्या व्यक्तींना भेटणार आहेत आणि न्यूझीलंड इंटरनॅशनल एडुकेशन परिषदेला संबोधित करणार आहेत.

<><><><><>

महाराष्ट्रात अल्पसंख्यंकांच्या उन्नती करता टार्टी, बार्टी, महाज्योतीच्या धरतीवर मार्टी अर्थात अल्पसंख्यांक संशोधन आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आज राज्य सरकारच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. या संस्थेसाठी एकूण ११ पदं निर्माण केली जातील. तसंच  ६ कोटी २५ लाख रुपये प्रशासनिक खर्चासाठीही मंत्रीमंडळानं मान्यता दिली आहे.

शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन करण्यासाठी महत्वाकांक्षी वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. यामुळे पावणे चार लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

आदिवासी भागातल्या प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांची मुदत वाढ देण्याचाही निर्णय घेण्यात आला. अनुसुचित जाती जमातीच्या जात, वैधता प्रमाणपत्र मिळण्यातल्या अडचणी दूर करण्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णयही राज्य सरकारनं घेतला आहे. विविध प्रकल्पांमुळे बेघर झालेल्या प्रकल्प बाधितांना घरं देण्यासाठी विविध नियमांमध्ये बदल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही यावेळी घेण्यात आला.

**<><><><><>**

महाविकास आघाडीत कोणताही पक्ष ‘छोटा भाऊ, मोठा भाऊ’ नाही, महाविकास आघाडी म्हणूनच विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार असून मुख्यमंत्रीपदाचा निर्णय निवडणुकीनंतर होईल, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज सांगितलं. विधानसभा निवडणुकीसंदर्भात काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांची बैठक आज मुंबईत गांधीभवनात झाली. त्यानंतर पटोले बातमीदारांशी बोलत होते.

आजच्या बैठकीत जागा वाटपावर प्राथमिक चर्चा झाली, तसंच राज्यातल्या विविध मुद्द्यांवर चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं. जागा वाटपाचा निर्णय गुणवत्तेनुसारच होणार आहे, असं ते म्हणाले.

विधानसभा निवडणुकीच्या जाहिरनाम्याची जबाबदारी पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे दिली आहे, ते समाजातल्या विविध घटकांशी चर्चा करून सर्वसमावेशक जाहीरनामा तयार करतील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शेअर बाजारात गेल्या ३ दिवसांच्या पडझडीनंतर आज वाढ पहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज दिवसअखेर ८७५ अंकांची वाढ नोंदवत, ७९ हजार ४६८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३०५ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार २९८ अंकांवर बंद झाला. या वाढीचा तेल, वायू , धातू आणि ऊर्जा क्षेत्रातल्या कंपन्यांना मोठा फायदा झाला.

**<><><><><>**

श्रीलंकेत कोलंबो इथं सुरु असलेल्या तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात, श्रीलंकेनं भारतापुढं विजयासाठी २४९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेनं निर्धारित ५० षटकात ७ गडी गमावून २४८ धावा केल्या. अविष्का फर्नांडोचं शतक थोडक्यात हुकलं त्यानं ९६ धावा केल्या. कुशल मेंडिस ५९, तर पथुम निशंकानं ४५ धावांचं योगदान दिलं. भारतातर्फे रियान परागनं ३ गडी बाद केले.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना, भारताची फलंदाजी ढेपाळली असून, शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या २४ षटकात ८ बाद १३६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताला मोठा धक्का बसला आहे. भारताची पैलवान विनेश फोगाट हिला ऑलिम्पिकमधून अपात्र ठरवण्यात आलं आहे. अंतिम फेरीच्या आधी तिचं वजन काही ग्रॅमनं अधिक भरल्यानं तिच्यावर ही

कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळं विनेशला अंतिम फेरीचा सामना खेळता येणार नाही आणि तिला पदकही दिलं जाणार नाही.

**<><><><><>**

विनेश फोगाटला अपात्र ठरवण्याच्या निर्णयाचा निषेध संयुक्त जागतिक ऑलिम्पिक संघटनेकडे नोंदवल्याची माहिती क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी आज लोकसभेत दिली. केंद्र सरकार महिला पैलवानांना सर्व प्रकारची मदत देत असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वतः या मुद्द्याबद्दल भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांच्याशी चर्चा केली असल्याचं त्यांनी निवेदनात सांगितलं. या परिस्थितीत आपल्याकडे काय पर्याय आहेत, याची चाचपणी करण्याची सूचना संघटनेला दिल्याचंही त्यांनी नमूद केलं.

विनेश फोगाट हिला अपात्र ठरवल्याबद्दल भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्ष पी.टी. उषा यांनी दुःख व्यक्त केलं आहे. भारतीय कुस्ती महासंघानं जागतिक कुस्ती संघटनेला अपात्रतेच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी दाद मागितली आहे. भारतीय ऑलिंपिक संघटना या प्रकरणाचा पाठपुरावा करत असून विनेशला सर्व सहकार्य केल जात असल्याचंही त्या म्हणाल्या.

दरम्यान, पॅरिस ऑलिंपिकमधले भारताचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दिनशॉ पारडीवाला यांनी विनेश हिचं वजन १०० ग्रॅमनं जास्त भरल्याचं म्हटलं आहे. वजन कमी व्हावं यासाठी सर्व उपाययोजना केल्या होत्या असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

विनेश फोगाटनं आत्तापर्यंत पॅरिस ऑलिम्पिकमध्ये केलेल्या कामगिरीचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कौतुक केलं आहे. देशाला तिचा अभिमान असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं. तिला अपात्र ठरवल्यामुळे संपूर्ण देश निराश आहे, पण तरीही सर्व देशवासीयांसाठी ती चॅम्पियन असल्याचं मूर्मू यांनी नमूद केलं.

विनेश फोगाटला अपात्र ठरवण्याच्या निर्णयाबद्दल गृहमंत्री अमित शहा यांनीही निराशा व्यक्त केली. यामुळे कोट्यवधी भारतीयांना धक्का बसल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये नमूद केलं.

**//<><><><><>//**